तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १ मे २०२४

आतील पानावर

पान ९ – माधुरीला घाबरून मी तो सिनेमा नाकारला
पान १० – विद्या बालन अन् माधुरी एकत्र डान्स
पान ११ – समांथा जुने कपडे पुन्हा करणार 'डिझाइन'
पान ५ – सोनाली-मृण्मयी दिसणार 'या' सिनेमात
पान ७ – प्रिती झिंटाचे सिनेसृष्टीत दमदार कमबॅक

बऱ्याच दिवसांपासून प्रभास आणि दीपिका पादुकोणचे चाहते 'कल्की २८९८' ची वाट पाहत आहेत. चित्रपटाची रिलीज डेट अद्याप जाहीर करण्यात आलेली नसून स्टारकास्टचा फर्स्ट लूक समोर आला आहे. या चित्रपटात प्रभास, दीपिका पादुकोण, अमिताभ बच्चन, कमल हासन आणि दिशा पटानीसारखे स्टार्स दिसणार आहेत. या चित्रपटासाठी सर्व स्टार्सनी कोटींमध्ये मानधन घेतले आहे. 'कल्की २८९८ एडी' या चित्रपटात प्रभास मुख्य भूमिकेत झळकणार आहे. या चित्रपटासाठी अभिनेत्याने करोडो रुपये कमवले आहेत. प्रभास त्याच्या चित्रपटांसाठी १०० कोटी रुपये मानधन घेतो. याआधी त्याचे 'आदिपुरुष' आणि 'राधे श्याम' हे दोन चित्रपट फ्लॉप ठरले होते. असे असूनही, रिपोर्टनुसार, त्याला 'कल्की २८९८ एडी' चित्रपटासाठी ५० टक्के जास्त फी मिळाली आणि त्याने १५० कोटी रुपये घेतले. 'कल्की २८९८ एडी'मध्ये दीपिका पदुकोण मुख्य अभिनेत्रीच्या भूमिकेत दिसणार आहे. मात्र, तिची फी प्रभासच्या तुलनेत खूपच कमी आहे.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, अभिनेत्रीने तिच्या शेवटच्या 'फाइटर' चित्रपटासाठी १५ कोटी रुपये घेतले होते. तर 'कल्की २८९८ एडी'साठी तिने २० कोटी रुपये मानधन घेतले आहे. अमिताभ बच्चन देखील 'कल्की २८९८ एडी' चा एक भाग आहेत. या चित्रपटात ते अश्वत्थामाची भूमिका साकारणार आहेत. नुकताच या चित्रपटातील त्यांचा फर्स्ट लूक समोर आला असून आता त्यांची फी देखील समोर आली आहे. 'कल्की २८९८ एडी' या चित्रपटात अश्वत्थामाची भूमिका साकारण्यासाठी बिग बींनी १८ कोटी रुपये आकारले असल्याचे बोलले जात आहे. 'कल्की २८९८ एडी'मध्ये कमल हसनचा कॅमिओ दिसणार आहे. अशा परिस्थितीत अभिनेत्याने या चित्रपटासाठी २० कोटी रुपये घेतले आहेत. दिशा पटानी 'कल्की २८९८ एडी'मध्येही दिसणार आहे. या चित्रपटासाठी दिशाने केवळ २ कोटी रुपये फी घेतली आहे. ही अभिनेत्री अखेरची सिद्धार्थ मल्होत्रासोबत 'योद्धा' चित्रपटात दिसली होती आणि या चित्रपटासाठीही अभिनेत्रीने तेवढीच रक्कम घेतली होती.






# 'कल्कि २८९८ एडी'साठी प्रभासनं घेतलं तगडं मानधन

# बॉलीवूड सेलिब्रिटी अंत्यसंस्काराला जायचे पैसे घेतात



बॉलिवूड अभिनेता आणि स्विस मिलिटरी वर्ल्डवाइड एमडी अनुज साहनी व मानव सुबोध यांनी या सिनेइंडस्ट्रीतील काळी बाजू उघड केली आहे. त्यांनी जे सांगितलं त्यावर विश्वास ठेवणं अवघड आहे. त्यांच्यामते, बॉलीवूड स्टार फक्त पार्टी, कॉन्सर्ट किंवा लग्नसमारंभात परफॉर्म करण्यासाठी पैसे घेत नाहीत तर अंत्यसंस्काराला जाण्यासाठीही पैसे घेतात. एका शोमध्ये ते म्हणाले की जिथं बॉलीवूड कलाकार जातात, तिथं आपोआप माध्यमं पोहोचतात. हे सेलिब्रिटी चित्रपटांव्यतिरिक्त चाहत्यांना पार्ट्या, मोठ्या उद्योगपतींची लग्नं, कॉन्सर्ट इत्यादींमध्ये दिसतात. याचबरोबर कोणाचा मृत्यू झाला असेल तर त्यांच्या अंत्यसंस्कार किंवा प्रार्थना सभेला बॉलीवूड स्टार्स हजेरी लावतात. अंत्यसंस्काराला जाण्यासाठी हे सेलिब्रिटी मोठी रक्कम आकारतात, असा दावा अनुज साहनी यांनी केला आहे.

मोठ्या स्टार्सची कमाई लग्नांमधून होते. ते लग्नाला जातात आणि नाचतात, त्याबदल्यात पैसे घेतात. इतकंच नाही तर अंत्यसंस्कार आणि तेराव्याला जाण्याचेही ते पैसे घेतात, त्यातून ते मोठी कमाई करतात. पण लोकांना याबद्दल माहिती नसते, असं अनुज म्हणाले. अंबानींच्या पार्टीत सलमान खान, शाहरुख खानसह अनेक बॉलीवूड स्टार्स परफॉर्म करताना दिसतात, पण तिथे ते मोफत परफॉर्म करतात. पण इतर बऱ्याच पार्ट्या किंवा मोठ्या लग्नांमध्ये परफॉर्म करण्यासाठी ते भरमसाठ पैसे घेतात. रिपोर्ट्सनुसार, सलमान खान अशा कार्यक्रमांसाठी तीन कोटी रुपये घेतो. दीपिका पदुकोण इव्हेंट्समध्ये परफॉर्म करण्यासाठी दीड कोटी रुपये, रणवीर सिंग १.७५ कोटी रुपये घेते. रणबीर कपूरची फी दीड कोटी रुपये आहे आणि आलिया भट्टही तेवढंच मानधन घेते. वरुण धवन एक कोटी, कतरिना कैफ ५० लाख, सिद्धार्थ मल्होत्रा ५० लाख घेतो. पंजाबी गायक दिलजीत दोसांझ एका परफॉर्मन्ससाठी तीन लाख रुपये घेतो.

# चक्क! १०० किलोचा ड्रेस घालून उर्फी रेड कार्पेटवर

उर्फी जावेद सध्या आपल्याला स्प्लिट्सविला शो पाहायला मिळत आहे. उर्फी नेहमीच तिच्या अतरंगी फॅशनमुळे आणि तिच्या आगळ्यावेगळ्या ड्रेसमुळे चर्चेत असते. उर्फीने भले मोठ्या डिझायनर्ससोबत काम केले असेल, पण आजही ती स्वत:चे कपडे डिझाइन करते. नुकताच एक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला जात आहे. ज्यामध्ये उर्फीचा रेड कार्पेट लूक पाहून सगळेच थक्क झाले आहेत. अनेकदा उर्फी तिच्या बोल्ड स्टाईल आणि शॉर्ट कपड्यांमध्ये दिसणारी उर्फी बऱ्याच कमीवेळा पूर्ण कपड्यांमध्ये दिसते. बऱ्याच वेळा तर ती तिच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे चर्चेत असते. उर्फी जावेद नुकतीच रेड कार्पेटवर दिसली. अहो, हे रेड कार्पेट स्वतः उर्फीचे होते, ज्यावर ती फक्त चालत होती. व्हिडिओमध्ये तुम्ही पाहू शकता की, अभिनेत्री हेवी ब्लू कलरच्या गाऊनमध्ये दिसत आहे. हा गाऊन घालून उर्फी टेम्पोमधून खाली उतरते आणि रेड कार्पेटवर मीडियासाठी पोज देताना दिसते. उर्फी मीडियासमोर म्हणाली की, मला रेड कार्पेटवर कोणीही बोलावत नाही. म्हणून मी स्वतः रेड कार्पेट तयार केला. मी माझ्या रेड कार्पेटवर सर्व काही स्वतः करेन, मला कोणी बोलावले किंवा आमंत्रित केले तरी मी माझे रेड कार्पेट स्वतःच करेन.

तिच्या गाऊनचे वजन ९० ते १०० किलो आहे. ते तयार करण्यासाठी सुमारे ४५० मीटर कापड वापरण्यात आले आणि संपूर्ण पोशाख तयार करण्यासाठी दोन-तीन महिने लागले. १०-११ जणांनी मिळून बनवले आहे.



# माधुरीला घाबरून मी 'तो' सिनेमा नाकारला



'हिरामंडी द डायमंड बझार' या सिनेमातून अभिनेत्री मनीषा कोईराला बऱ्याच काळाने सिनेविश्वात कमबॅक करतेय. संजय लीला भन्साळी यांच्या या बिग बजेट प्रोजेक्टमध्ये मनीषा महत्त्वपूर्ण भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. १९४० या स्वातंत्र्यपूर्व दशकातील काळ या सिनेमात प्रेक्षकांना पाहता येणार असून मनीषा यात मल्लिका जान या तवायची भूमिका साकारतेय. उच्चभ्रू वेश्यांची मालकीण असलेल्या एका श्रीमंत तवायच्या भूमिकेत मनीषा दिसणार आहे. या सिनेमाच्या प्रोमोशननिमित्त मनिषाने दिलेल्या एका मुलाखतीत तिला आयुष्यात कोणत्या गोष्टीचा जास्त पश्चाताप होतोय याविषयी खुलासा केला. नुकतंच मनिषाने एक मुलाखत दिली. तेव्हा तिला करिअरमधील कोणत्या निर्णयाचा सगळ्यात जास्त पश्चाताप होतो याविषयी विचारण्यात आलं. यावेळी ती म्हणाली, मी कधीच यश चोप्रा यांच्या सिनेमात काम केलं नाही याचा मला खूप पश्चाताप होतो. मला सिनेमात माधुरीजींच्या विरुद्ध काम करायचं होत आणि मी घाबरले. तो प्रोजेक्ट त्यामुळे मी सोडून दिला. त्यानंतर बऱ्याच काळाने मनिषाने माधुरीसोबत लज्जा या सिनेमात स्क्रीन शेअर केली. या सिनेमात तिने केलेलं काम आणि तिच्यावर आणि माधुरीवर चित्रित झालेला 'बडी मुश्किल' या गाण्यावरील डान्स बराच गाजला होता. याबाबत सांगताना ती म्हणाली, माधुरीजी या एक उत्तम अभिनेत्री आणि व्यक्ती आहेत. मला असुरक्षित वाटून घेण्याची काहीही गरज नव्हती. माझ्यासमोर एक इतकी दमदार अभिनेत्री असताना तुम्ही अजून चांगलं परफॉर्म करू शकता. ते तुम्हाला अजून चांगलं परफॉर्म करायला प्रोत्साहन देतात आणि ते तुमचा अनुभव आणि वयचं तुम्हाला शिकवत. मला त्या सिनेमातील माधुरी यांचं काम आवडलं आणि रेखा यांचंसुद्धा. सूत्रांच्या माहितीनुसार, मनीषाला 'दिल तो पागल है' या सिनेमात काम करण्याची ऑफर सिनेमाचे निर्माते यश चोप्रा यांनी दिली होती पण मनिषाने ती ऑफर नाकारली आणि मग ही भूमिका करिष्मा कपूरने साकारली. हा सिनेमा चांगलाच सुपरहिट झाला होता. शाहरुख खान आणि अक्षय कुमार यांचीही या सिनेमात मुख्य भूमिका होती.

# विद्या अन् माधुरीचा एकत्र डान्स



**भू**ल भुलैया' आणि 'भूल भुलैया २' च्या यशानंतर, अनीस बज्मी आणि भूषण कुमार यावर्षी दिवाळीच्या मुहूर्तावर या कॉमिक फ्रँचायझीचा पुढचा भाग आणण्यासाठी सज्ज आहेत. मंजुलिकाच्या भूमिकेत विद्या बालन १७ वर्षांनंतर 'भूल भुलैया'च्या दुनियेत परतली आहे, तर कार्तिक आर्यन या चित्रपटात मुख्य भूमिकेत आहे. माधुरी दीक्षितही यात दिसणार आहे. चित्रपट सध्या फ्लोरवर आहे. या चित्रपटात पूर्वी कधीही न पाहिलेला डान्स पाहायला मिळणार आहे.

विद्या आणि माधुरी एकत्र डान्स करतांना दिसणार आहे. निर्माते 'भूल भुलैया ३' मध्ये विद्या बालन आणि माधुरी दीक्षित यांच्यात अनोखा डान्स फेस ऑफ करण्याची योजना आखत आहेत. 'विद्या आणि माधुरी दोघीही या फेस ऑफसाठी तयार आहे. भूषण कुमार आणि त्यांची टीम विद्या आणि माधुरी यांच्यावर चित्रित करण्यासाठी अमी जे तोमरची तयारी करत आहे. येत्या महिनाभरात या गाण्याचे चित्रीकरण होणार आहे. सध्या त्याची कोरिओग्राफी केली जात आहे. सूत्राने पुढे सांगितले की, कार्तिक आर्यन देखील गाण्यात दिसू शकतो. 'भूल भुलैया ३'च्या एका महत्त्वाच्या टप्प्यावर दिसणारं हे गाणं आहे. सर्व प्रमुख व्यक्तिरेखा लक्षात घेऊन त्याची रचना केली जात आहे. जिथे विद्या बालन तिच्या उपस्थितीने पुन्हा एकदा या गाण्यात जीव फुंकणार आहे. निर्माते माधुरीसोबत फेस ऑफ होण्याची शक्यता असल्याची चर्चा आहे. याबाबत लवकरच अंतिम निर्णय घेतला जाईल. 'भूल भुलैया ३'चे पोस्ट-प्रॉडक्शन प्रक्रिया दिवाळी २०२४ च्या रिलीजपूर्वी होऊ शकते याची खात्री करण्यासाठी निर्मात्यांनी आधीच काही उच्च-एंड VFX दृश्ये शूट केली आहेत. चर्चा अशी आहे की टीमने एक हाय-ऑन व्हीएफएक्स गाणे शूट केले आहे. ज्यामध्ये कार्तिक आर्यन देखील दिसणार आहे. 'भूल भुलैया ३'मध्ये राजपाल यादव आणि संजय मिश्राही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत.



# करीनाला येतोय भन्साळीचा राग

**बॉ**लीवुड अभिनेत्री करीना कपूर खान तिच्या सौंदर्यासोबतच उत्कृष्ट अभिनयासाठी ओळखली जाते. संजय लीला भन्साळी यांनी तिला 'गोलियों की रास लीला राम-लीला'ची ऑफर दिली होती पण अभिनेत्रीने चित्रपट करण्यास नकार दिला. याबाबत अभिनेत्रीला विचारले असता तिने सांगितले की, 'माझ्याकडे काम नसले तरी मी भन्साळी यांच्या चित्रपटात काम करणार नाही. यामागचे कारण आहे भन्साळी यांचा 'देवदास' चित्रपट.' खरे तर करीनाला देवदासमध्ये पारोची भूमिका ऑफर करण्यात आली होती. यासाठी तिला साइनिंग अमाउंटही देण्यात आली होती पण नंतर तिची जागा ऐश्वर्या रायने घेतली. नंतर जेव्हा करीनाला गोलियों की रासलीला राम-लीलाची ऑफर आली तेव्हा तिने हा चित्रपट करण्यास नकार दिला होता. याबद्दल बोलताना करीनाने फिल्मफेअरला सांगितले होते, मी हे कधीच करणार नाही. त्याने माझ्याशी जे केले ते चुकीचे होते. त्यांनी देवदाससाठी माझी स्क्रीन टेस्ट केली, मला साइनिंग अमाउंट दिली, मग दुसरे कोणीतरी घेतले. तो चुकीचा होता, मला खूप त्रास झाला कारण मी माझ्या करिअरच्या सुरुवातीला होते. संजयने मला दुखावले. माझ्याकडे काम नसले तरी मी त्यांच्यासोबत कधीही काम करणार नाही. करणच्या कल हो ना होसाठी देखील करीनाला अप्रोच करण्यात आले होते, या चित्रपटात शाहरुख खान आणि सैफ अली खान होते.





# 'मिस्टर अँड मिसेस माही' प्रेक्षकांच्या भेटीला

**ए**कामागोमाग एक चित्रपट सिनेमागृहात प्रदर्शित होत आहेत. नुकताच 'मैदान' आणि 'बडे मियां छोटे मियाँ' चित्रपट प्रदर्शित झाला. यानंतर आता 'मिस्टर अँड मिसेस माही' प्रेक्षकांच्या भेटीस कालच आला आहे. मागील काही दिवसांपासून प्रतिक्षेत असलेल्या या चित्रपटाची रिलीज डेटमध्ये सतत बदल केला जात होता.

अखेर हा सिनेमा रिलीज करण्यात आला आहे. दोन वर्षांपूर्वीच या सिनेमाची घोषणा करण्यात आली होती. आधी १९ एप्रिलला हा सिनेमा प्रदर्शित होणार होता. पण, आता ३१ मे रोजी 'मिस्टर अँड मिसेस माही' प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. करण जोहरच्या धर्मा प्रोडक्शनने 'मिस्टर अँड मिसेस माही' सिनेमाची निर्मिती केली आहे. करणने पोस्ट शेअर करत या सिनेमाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर केली होती. काही चित्रपट हे स्टोरीपेक्षा अधिक असतात. प्रेक्षकांना ते त्यांच्या स्वप्नांविषयी सांगतात. 'मिस्टर अँड मिसेस माही' हा सिनेमा आमच्या जवळचा आहे. या सिनेमाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करत आहोत. असं या पोस्टमध्ये करणने म्हटलं होतं.

दरम्यान, 'मिस्टर अँड मिसेस माही' सिनेमा भारताचा माजी कर्णधार आणि उत्कृष्ट क्रिकेटर असलेल्या महेंद्रसिंग धोनीवर आधारित असल्याचं म्हटलं जात आहे. शरण शर्मा यांनी या सिनेमाचं दिग्दर्शन केले असून यात राजकुमार महेंद्र तर जान्हवी महिमाच्या भूमिकेत दिसत आहे.



# विजय कोंडकेंचा 'लेक असावी तर अशी' प्रेक्षकांच्या भेटीला

अभिनेता ज्येष्ठ दिग्दर्शक विजय कोंडके हे नाव घेतलं की, 'माहेरची साडी' हा चित्रपट डोळ्यांसमोर येतो. या चित्रपटाने मराठी चित्रपट उत्पन्नाचे सर्व उच्चांक मोडले. निर्मिती, वितरण आणि दिग्दर्शन अशी तिहेरी मुशाफिरी करत विजय कोंडके यांच्या मराठी चित्रपटाने यशाचे आणि लोकप्रियतेचे नवे मापदंड निर्माण केले. १९९१ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'माहेरची साडी' चित्रपटाच्या यशानंतर निर्माता- दिग्दर्शक विजय कोंडके यांनी ३४ वर्षानंतर पुन्हा एकदा नव्या मराठी चित्रपटाची घोषणा केली आहे. विजय कोंडके यांची निर्मिती, दिग्दर्शन असलेला 'लेक असावी तर अशी' हा मराठी चित्रपट लवकरच भेटीला येतोय. 'ज्योती पिक्चर्स' निर्मित आणि एव्हरेस्ट एंटरटेनमेन्टची प्रस्तुती असलेला हा चित्रपट प्रेक्षकांसाठी मनोरंजनाची मेजवानी असणार आहे. सोंगाड्या, पांडू हवालदार, बोट लावीन तिथं गुदगुल्या, तुमचं आमचं जमलं, राम राम गंगाराम, आली अंगावर यांसारख्या दादा कोंडके यांच्या अनेक यशस्वी चित्रपटांच्या वितरणामध्ये विजय कोंडके यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. मराठी प्रेक्षकांची अभिरुची ओळखून त्यानुसार यशस्वी चित्रपट निर्मिती करण्याची गुरुकिल्ली माहीत असलेले विजय कोंडके 'लेक असावी तर अशी' हा कौटुंबिक चित्रपट प्रेक्षकांच्या रंजनासाठी घेऊन सज्ज झाले आहेत. निर्माते-वितरक म्हणून स्वत:ची ओळख निर्माण केल्यानंतर आपणही कधीतरी दिग्दर्शकाच्या खुर्चीत बसून आपल्या मनातील सिनेमा बनवण्याच्या इच्छेतून आणि दादा कोंडके यांनी दिलेल्या संधीमुळे मी 'माहेरची साडी' या चित्रपटाच्या दिग्दर्शनाचे शिवधनुष्य उचलले. यशापलीकडे या चित्रपटाने मला रसिकांचे अमाप प्रेमही मिळवून दिले. रसिकांच्या याच प्रेमापोटी 'लेक असावी तर अशी' हा नवा मराठी चित्रपट मी घेऊन येतोय.

# सोनाली-मृण्मयी दिसणार 'या' सिनेमात

प्रेम अभिनेत्री सोनाली कुलकर्णी ओळखली जाते ते तिच्या वेगवेगळ्या भूमिकांसाठी. प्रत्येक सिनेमातून वेगवेगळ्या भूमिका साकारण्याचा प्रयत्न करणारी सोनाली आता एका नव्या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीस येतेय. 'रावसाहेब' असं तिच्या या आगामी सिनेमाचं नाव असून नुकतंच सिनेमाच्या टीमने या सिनेमाचं डबिंग पूर्ण केलं. सोशल मीडियावर सोनालीने या सिनेमाच्या डबिंगचे फोटोज शेअर केले. सोनालीचा लवकरच रावसाहेब हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीस येणार असून नुकतंच या सिनेमाचं डबिंग पूर्ण झालं. दिग्दर्शक निखिल महाजनने या सिनेमाचं दिग्दर्शन केलं आहे. तर अभिनेत्री मृण्मयी देशपांडेसुद्धा या सिनेमात काम करतेय. सोशल मीडियावर सोनालीने डबिंग संपल्यानंतर केलेल्या सेलिब्रेशनचे फोटोज शेअर करताना दिसतेय. यातील एका फोटोमध्ये ती निखिलला लाथ

दाखवताना दिसतेय तर एका फोटोत तिने मृण्मयीसोबत पोझ दिलीये. या फोटोजना कॅप्शन देताना ती म्हणाली, त्याने आम्हाला त्रास दिला म्हणून नाही पण त्याने Kibkarr फिल्म बनवली म्हणून. रावसाहेब सिनेमाचं चित्रीकरण आम्ही पूर्ण केलं आहे आणि लवकरच आम्ही तुम्हाला सिनेमागृहात भेटू!! सोनालीच्या या फोटोजवर अनेकांनी कमेंट करत तिला शुभेच्छा दिल्या तर मृण्मयी सोनालीवर चिडली. पिक्चर क्रेडिट द्यायची काही पद्धत? असा जाब तिने सोनालीला विचारला त्यावर निखिलने सुद्धा कमेंट करत मृण्मयीची बाजू घेतली. तुझं बरोबर आहे. मलाही सोनालीचं हे वागणं बिलकुल नाही आवडलं. असा रिप्लाय त्याने दिला. त्यांची ही नोकझोक नेटकऱ्यांना आवडली असून यावर आता सोनाली काय उत्तर देणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागून राहीलं आहे. रावसाहेब हा सिनेमा नक्की कशावर आधारित आहे? या सिनेमात अजून कोण कलाकार असणार हे अजून रिव्हील करण्यात आलं नाहीये. लवकरच हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीस येणार असल्याचा अंदाज आहे. दरम्यान, सोनालीचा लवकरच मोगलमर्दिनी छत्रपती ताराराणी हा सिनेमाही लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येतोय. काही कारणास्तव या सिनेमाचं प्रदर्शन पुन्हा एकदा पुढे ढकललं गेलं आहे.





# मकरंद अनासपुरेंचा नवा सिनेमा 'राजकारण गेलं मिशीत'

मकरंद अनासपुरे हे मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेते. दे धक्का, गल्लीत गोंधळ दिल्लीत मुजरा, गाढवाचं लग्न अशा विविध सिनेमांच्या माध्यमातून मकरंद अनासपुरे यांनी प्रेक्षकांना खळखळून हसवलं. इतकंच नव्हे तर रंगा पतंगा, गोष्ट छोटी डोंगराएवढी अशा सिनेमांच्या माध्यमातून मकरंद अनासपुरे यांनी सामाजिक प्रश्नांवर सुद्धा बोट ठेवलं.

सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करणारा मकरंद अनासपुरेंच्या 'राजकारण गेलं मिशीत' सिनेमा भेटीला आलाय. सध्या चालू असलेल्या राजकारणावर मार्मिक आणि खुसखुशीत भाष्य करणारा जेष्ठ ग्रामीण लेखक रा. रं. बोराडे ह्यांच्या अंग अंग मिशी ह्या कथेवर आधारीत राजकारण गेलं मिशीत या सिनेमाची चर्चा आहे. बकुळी क्रिएशनची निर्मिती असलेला आणि




मकरंद अनासपुरे यांचं दिग्दर्शन व प्रमुख भूमिका असलेला चित्रपट नुकताच महाराष्ट्रभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे. सध्या निवडणुकीचं वातावरण आहे. या वातावरणामध्ये प्रेक्षकांना मनसोक्त हसवून विचार करायला लावणार हा एक सुंदर मार्मिक सिनेमा आहे. या अगोदर मकरंद अनासपुरे यांचे राजकीय पार्श्वभूमी असलेले खुर्ची सम्राट, गल्लीत गोंधळ दिल्लीत मुजरा, पुन्हा गोंधळ पुन्हा मुजरा यासारखे राजकीय विनोदी चित्रपट अतिशय गाजले. तसाच उत्कृष्ट प्रतिसाद याही चित्रपटाला मिळेल याची खात्री मकरंद अनासपुरे आणि त्यांच्या टीमने व्यक्त केलेली आहे. या चित्रपटाचे निर्माते मच्छिंद्र लंके, सुरेश पठारे, शिल्पा अनासपुरे, त्रिशला देशमाने असून छाया दिग्दर्शक सुरेश देशमाने तर संगीत अतुल दिवे यांनी केलंय.



# रजनीकांत- लोकेश आणताहेत काहीतरी नवीन

दाक्षिणात्य यशस्वी दिग्दर्शक आणि निर्माता लोकेश कनगराज सध्या सुपरस्टार रजनीकांत यांच्यासोबत आपल्या चित्रपटावर काम करत आहेत. या चित्रपटाचे टायटल 'थलाइवर १७१' आहे.

या चित्रपटाची घोषणा मागील वर्षी झाली होती. याआधी अवतीभवती फिरते. लोकेश चित्रपटात नवं काही तरी घेऊन येणार आहेत. याआधी 'थलाइवर १७१' विषयी लोकेशने खुलासा केला होता की, चित्रपट अद्याप प्री प्रोडक्शनमध्ये आहे. शूटिंग सुरू होण्यास चार-पाच महिने लागतील. चित्रपटाच्या शूटिंग बद्दल अपडेट देण्यात आले होते. सुपरस्टार रजनीकांत यांची थलाइवर १७१ नावाच्या चित्रपटात एक डार्क साईड पात्र असेल. हा चित्रपट लोकेश कनागराज आणि रजनीकांत यांच्यातील पहिला सहयोग आहे.

एका मुलाखतीत लोकेशने नमूद केले होते की तो थलायवर १७१ मध्ये काहीतरी नवीन प्रयोग करणार आहे. रजनीकांत यांचे चाहते खूप उत्सुक आहेत. तेलुगु सुपरस्टार नागार्जुन रजनीकांत यांच्यासोबत भूमिका करणार का, याकडे चाहत्यांचे लक्ष लागून राहिले आहे. 'थलाइवर १७१' चा अधिकृत प्रोमो व्हिडिओ २२ एप्रिल रोजी रिलीज झाला आहे. हे देखील वृत्त समोर आले होते की, टायटल लॉन्चचे शूटिंग रजनीकांतसोबत आधीच संपुष्टात आले होते. सन पिक्चर्स अंतर्गत या चित्रपटाची निर्मिती होत आहे. अनिरुद्ध रविचंदर चित्रपटाला संगीत देतील. रिपोर्ट्सनुसार, या चित्रपटाची कहाणी 'थलाइवर १७१' ड्रग्सच्या




# समांथा जुने कपडे पुन्हा करणार 'डिझाइन'

प्रसिद्ध अभिनेत्री समंथा रुथ प्रभू हे दक्षिण भारतीय चित्रपटांमधील एक मोठे नाव आहे. तिच्या चित्रपटांव्यतिरिक्त, ती तिच्या फॅशन सेन्ससाठी देखील ओळखली जाते. ट्रेंडिंग फॅशनची चांगली समज असल्यामुळे तिचे फॅशन जगात नेहमी नाव चर्चेत असते. समंथा सध्या पुन्हा एकदा वेडिंग गाऊनमुळे चर्चेत आहे. प्रसिद्ध अभिनेत्री समंथा रुथ प्रभू हे दक्षिण भारतीय चित्रपटांमधील एक मोठे नाव आहे. तिच्या चित्रपटांव्यतिरिक्त, ती तिच्या फॅशन सेन्ससाठी देखील ओळखली जाते. ट्रेंडिंग फॅशनच्या चांगल्या समजामुळे तिला फॅशन जगतात खूप आदर आहे.

समंथा सध्या पुन्हा एकदा चर्चेत आहे. यावेळी ती तिच्या वेडिंग गाऊनमुळे चर्चेत आहे. अभिनेत्रीने तिच्या एका पावलाने संपूर्ण फॅशन इंडस्ट्रीला एक मजबूत संदेश दिला आहे. तिने तिच्या लग्नात परिधान केलेला वेडिंग गाऊन सुंदर काळ्या बॉडीकॉन ड्रेसमध्ये पुन्हा डिझाइन केला आहे. सोशल मीडिया अकाउंटवर तिने एक व्हिडिओ शेअर केला आहे. यामध्ये डिझायनर्स काळजीपूर्वक तिच्या वेडिंग गाऊनला नवीन आउटफिटमध्ये बदलताना दिसत आहेत. या व्हिडिओच्या कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, 'नवीन आठवणी नेहमीच बनवता येतात. चालण्यासाठी नेहमीच नवीन मार्ग खुले असतात. सांगण्यासाठी नेहमीच नवीन कथा असतात.

लग्नाच्या पोशाखापासून बनवलेल्या नवीन ड्रेसमध्ये सामंथाने स्वतःचे फोटो सोशल मीडियावर पोस्ट केले आहे. या फोटोच्या कॅप्शनमध्ये अभिनेत्रीने लिहिले की, 'मी आज परिधान केलेला ड्रेस क्रेशा बजाजने माझ्या लग्नात घातलेला सुंदर गाऊन पुन्हा डिझाइन करून बनवला आहे. अनेकांना हे बिनमहत्त्वाचे आणि अनावश्यक वाटू शकते. मी माझ्या सवयी बदलण्यासाठी आणि माझी जीवनशैली अधिक टिकाऊ बनवण्यासाठी अनेक पावले उचलत आहे. मी तुम्हाला खात्री देऊ इच्छितो की माझे जुने कपडे पुन्हा डिझाइन करणे हे मी जाणूनबुजून उचलत असलेल्या पाउलांपैकी एक आहे.'

# साऊथ सुपरस्टार सूर्या साकारणार डबल रोल

साऊथ सुपरस्टार सूर्या लवकरच नव्या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीस येतोय. सूर्या कंगुवा या सिनेमात काम करत असून नुकतंच त्याने सोशल मीडियावर पोस्टर शेअर करत त्याचा सिनेमातील लूक रिव्हील केला. द आणि इन्स्टाग्राम या सोशल मिडीया प्लॅटफॉर्मवर त्याने त्याचं लूक पोस्टर शेअर करत तो या सिनेमात डबल रोल करत असल्याचं जाहीर केलं. त्याचा हा पोस्टर पाहून चाहते खुश झाले आणि सोशल मीडियावर त्यांनी त्यांचा आनंद व्यक्त केला. या पोस्टरमध्ये सूर्याचे दोन पूर्णपणे वेगळे लूक पाहायला मिळत आहेत.

पोस्टरमध्ये दिसणारा एक लूक आधीच टीझरमध्ये रिव्हील करण्यात आला होता. ड्रेडलॉक्स हेअरस्टाईल, लढाऊ पोशाख आणि हातात तलवार या त्याच्या लुकने आधीच सगळ्यांची मनं जिंकली होती आणि आता दुसऱ्या लुकनेही सगळ्यांच लक्ष वेधून घेतलं आहे. स्लीक हेअरस्टाईल, स्टायलिश सूट आणि हातात गन या लुकला सुद्धा प्रेक्षकांची पसंती मिळतेय. एकूणच या पोस्टरवरून दोन वेगवेगळ्या काळातील गोष्ट या सिनेमात पाहायला मिळणार असल्याचा अंदाज येतोय. २०२४ मध्ये हा सिनेमा रिलीज होणार असून अजून या सिनेमाची रिलीज डेट जाहीर करण्यात आली नाहीये. या सिनेमातून दिशा पटनी आणि बॉबी देओल साऊथ इंडियन सिनेमात पदार्पण करत आहेत. या सिनेमात बॉबी देओल निगेटिव्ह भूमिका साकारणार असून या सिनेमात भरपूर अॅक्शन आणि ड्रामा पाहायला मिळेल हे टीझर आणि पोस्टरवरून समजतंय. हा सिनेमा थ्री डी मध्ये आणि दहा भाषांमध्ये रिलीज होणार आहे. दिग्दर्शक शिवा हा सिनेमा रिलीज करणार आहे. स्टुडिओ ग्रीन आणि यूव्ही क्रिएशन्स या सिनेमाची निर्मिती करत आहेत.



# नौशाद अली



## चित्रपट संगीताच्या सुवर्ण काळाचे शिल्पकार

स्मरण
ॲड. सुनील पाळधीकर
भ्र. ९८२२६९२८४९

**संगीत ही ईश्वराची मानवाला मिळालेली अमूल्यअशी देणगी आहे. त्याच प्रमाणे संगीत हे परमेश्वर प्राप्तीचं एक साधन देखील आहे. एक उदाहरण देतो.'मन तरपत हरी दर्शन को आज' ही मालकंस रागामध्ये बांधलेली सुरेख अशी गीत रचना पहा. ही रचना होती शकील बदायुनी ह्या गीतकाराची आणि गीताला स्वर्गीय संगीतात सजवलं होतं नौशादसाहेबांनी आणि हे गीत सुंदर भक्तिरसात गायलं होतं मो. रफी साहेबांनी.**

गाण्याच्या गाण्याच्या रेकॉर्डिंगचा दिवस ठरला. गायक संगीत साथीदार आणि इतर मदतनीस ह्या सर्वांना सूचना देण्यात आल्या की, आज एका नितांत सुंदर भक्ती गीताचं रेकॉर्डिंग असल्यामुळे सर्वांनी स्नान करून मंगल वेशात रेकॉर्डिंगला पोहोचाव. सुंदर वातावरण निर्मिती करण्यात आली. स्टुडिओचा लाल दिवा लागला आणि मो. रफी साहेबांचे 'हरी ओम' हे शब्द आसमंतात घुमायला लागले. ह्या भक्ती गीताचं अजून एक विशेष म्हणजे, गीतकार, संगीतकार आणि गायक हे तिघेही मुस्लिम पण संस्कारीत. कुठेही उर्दू शब्दांचा उपयोग नाही, असेल तर संस्कृतची सुंदरशी झालर. नौशाद साहेबांचं संगीत म्हणजे पूर्णपणे अभिजात संगीताचा बाज कायम ठेवून संपूर्ण रागदारीवर आधारित गाणे बांधण्याची कला. आणि हे केवळ नौशाद साहेबच करू जाणे.

नौशाद मूळ लखनौचे, वडील कोर्टात नोकरीला होते. नौशादच्या घराचा आणि संगीताचा काडीमात्र संबंध नव्हता. मात्र, नौशाद दरवर्षी बाराबांकी जवळ उर्सला जायचे. तिथे एक बासरीवाला रात्रीच्या शांततेत सुंदर बासरीवर धून छेडायचा. नौशाद नकळत त्या बासरीच्या प्रेमातच पडले. त्यानंतर ते जिथून मिळेल तिथून संगीताचं ज्ञान प्राप्त करत होते. लखनौच्या लाटूश रोडवर एक वाद्य विक्रीच दुकान होतं. नौशाद वेळ मिळेल तेव्हा त्या दुकानासमोर उभे राहून वाद्ये न्याहाळीत असत. दुकानाचे मालक होते उस्ताद गुरबत अली यांनी एक दिवस नौशादला तू सारखा-सारखा माझ्या दुकाना समोर का? उभा राहातोस? म्हणून विचारले. नौशादनी त्यांना उत्तर दिले. मला संगीत खूप आवडतं, ही वाद्ये पाहिल्या नंतर माझ्या मनाला शांती मिळते, असे सांगितले. तो काळ मूक चित्रपटाचा होता. पडद्या समोर काही मंडळी वाद्य घेऊन बसायची आणि प्रसंगानुरूप संगीत द्यायची. आवड असल्यामुळे शाळकरी नौशाद त्या वादकांसोबत बसायचे आणि हळूहळू हार्मोनियम वाजवायलाही शिकले. नौशाद पिताश्री घरी नसतांना हार्मोनियमचा रियाज करत. एकदा चोरी पकडली गेली अन धाक दपटशा वर निभावलं. दुसऱ्यांदा मात्र त्यांच्या वडिलांचा पारा खूपच चढला आणि त्यांनी तो बाजा रस्त्यावर फेकला. तिकडे बाजा तुटला आणि इकडे नौशादच्या हृदयाचेच जणू तुकडे झालेत.

नौशाद ह्यांनी त्या दिवशी हिम्मत करून वडीलांशी बोलले, तुम्ही जर माझ्यासमोर पर्याय ठेवला कुटुंब की संगीत तर माझं उत्तर संगीत असेल. नौशाद ह्यांनी केवळ १७ वर्षाचं वय असतांना लखनौ सोडले. त्यांनी मुंबई गाठली. बघता बघता नौशाद ह्यांच मुंबईत चांगलंच बस्तान बसलं. नौशादसाहेबांनी १९४० साली भवनानी rodubtion च्या प्रेम नगरसाठी पहिल्यांदा स्वतंत्ररित्या संगीत दिलं. १९३७- ४० ह्या अस्तित्व निर्माण करण्याच्या काळात त्यांना ए. आर. करदार, मेहबूब खानसारखे निर्माते आणि नंतरच्या काळात मित्र झालेली मंडळी मिळाली. ह्या दोघांचे चित्रपट म्हणजे संगीतकार म्हणून नौशाद हे समीकरणच तयार झालं. १९४० नंतर नौशाद ह्यांनी मागे वळून पाहिलं नाही. १९४१ मध्ये नौशाद ह्यांनी प्रकाश ibrrver च्या 'माला' आणि 'दर्शन' अशा दोन आणि १९४२ मध्ये 'स्टेशन मास्टर' अशा तीन चित्रपटांना संगीत दिलं.

'स्टेशन मास्टर' च्या वेळेस एक किस्सा घडला. नौशादजींना एका गाण्यासाठी बाल गायक कलाकाराची आवश्यकता होती, त्यांनी ही जवाबदारी गायक जी. एम.दुर्रानी, ह्यांच्यावर सोपविली. दुसरेच दिवशी दुर्रानीसाहेब ८-९ वर्षाच्या एका मुलीला घेऊन आले सोबत तिची आजी देखील होती. ह्या मुलीनी चित्रपटात गाणं ही गायलं. नजीकच्या काळातच हीच मुलगी सूरय्या म्हणून नावा रूपाला आली आणि नौशादजींकडे तिने बरीच गाणी गायली. १९४४ मध्ये आलेला 'पहले आप' हा चित्रपट हिंदी चित्रपटसृष्टीला एक महान गायक देऊन गेला त्या गायकाच नाव होतं मो. रफी. वास्तविक पहाता रफी साहेबांचं पाहिलं गाणं रेकॉर्ड केलं ते संगीतकार शामसुंदर ह्यांनी 'गाव की छोरी' ह्या चित्रपटासाठी. मात्र पहिले प्रदर्शित झाला तो पहले आप आणि श्रेय गेलं ते नौशादजी ह्यांना. नौशादजींच्या मते त्यांचा गाजलेला त्यांचा पहिला चित्रपट म्हणजे 'रतन'. पुढे नौशाद साहेबांचे गाजलेले दोन चित्रपट १९४६ साली आले त्यात पहिला होता 'अनमोल घडी' आणि दुसरा 'शाहजहाँ'. खरंच अनमोल घडीच्या गाण्यांनी धूम मचविली होती. गायकांमध्ये त्यावेळी फार मोठं नाव होतं के. एल. सेहगल ह्यांचं आणि शाहजहाँचे नायक आणि गायक दोन्हीही सेहगल होते. नौशाद साहेबांनी एक किस्सा सांगितला. ते शाहजहाँच्या गाण्यांची तयारी करीत होते. त्यावेळी डोळ्यावर चष्मा असलेली आणि खाकी पॅंट पांढऱ्या शर्टातली एक व्यक्ती दाखल झाली. माधोक साहेबांनी नौशादला विचारलं ह्यांना ओळखलं का? नाही ना अरे हे कुंदनलाल सैगल आहेत. नौशादजींना आश्चर्याचा धक्काच बसला कारण नौशादजी स्वतः सैगलचे फॅन होते. त्यांनी सांगितलेला दुसरा किस्सा ही रोचक आहे. सैगल गाण्याच्या रेकॉर्डिंगसाठी येऊन बसले होते. सैगलजींनी विचारलं सुरू करायचं, नौशादजींनी हो म्हणताच त्यांनी आपल्या जोसेफ नावाच्या नोकराला काळी पाच आणण्याचा हुकूम सोडला. नौशादजींना आश्चर्य वाटले, सर्व वाद्यांची जय्यत तयारी असतांना सैगल काळी पाच काय मागतायेत. जोसेफ एका ग्लासमध्ये काळी पाच ह्या टोपण नावाची मदिरा घेऊन आला. टेक वर टेक सुरू झाले तसेच काळी पाचचे पेग वर पेग रिचविल्या जात होते पण हवं तसं गाणं काही रेकॉर्ड होत नव्हतं. रेकॉर्डिंगसाठी परत दुसरा दिवस ठरला. दुसर्या दिवशी सैगल साहेबांनी परत जोसेफला आवाज दिल्याबरोबर नौशाद म्हणाले सैगलसाहेब आज माझी एक विनंती ऐका मला फक्त एक रेकॉर्डिंग काळी पाच न घेता करू द्या आणि मग वाटेल तेवढी काळी पाच घ्या. नौशादजींनी पहिले दोन रेकॉर्डिंग बिना काळी पाच केले आणि नंतर काळी पाचचे पेग वर पेग आणि ५-६ रेकॉर्डिंग असा क्रम चालला. सैगल साहेबांनी गाणं ऐकायची इच्छा व्यक्त केली. नौशाद साहेबांनी त्यांना सुरवातीला काळी पाच घेऊन केलेले रेकॉर्डिंग ऐकविले आणि शेवटी सगळ्यात पहिल्यांदा काळी पाच शिवाय केलेलं रेकॉर्डिंग ऐकविलं. शेवटी ऐकविलेलं रेकॉर्डिंग सैगल ह्यांना खूप आवडलं. नौशादजींनी सैगल साहेबांना पटवून दिलं की, तूम्ही मदिरा न घेता खूप सुंदर गाता आणि ते गाणं होतं जब दिल ही टूट गया, हम जी के क्या करेंगे.

१९४५ ते १९५० पर्यंत च्या काळात नौशादसाहेबांनी अनेक चित्रपटांना संगीत दिलं. त्यात संन्यासी, किमत, नाटक, ऐलान, दर्द, अनोखी अदा, वैगरे. नौशाद परत प्रकाश झोतात आले ते १९४८ च्या मेलापासून. १९४७ च्या दर्दमध्ये नौशाद साहेबांनी उमादेवी नामक गायिकेला ब्रेक दिला. १९४८ च्या मेलासाठी नौशादजींनी मुकेशकडून बरीच गाणी गाऊन घेतली. रफी साहेबांचंही एक गाणं होतं, ये जिंदगी के मेले, अफसोस कम न होंगे मुकेश ह्यांच लक्षात राहण्यासारखं गाणं म्हणजे गाये जा गीत मिलन के. आता नौशाद यांचं नाव चित्रपटसृष्टीतील प्रथम क्रमांकाच्या संगीतकारांमध्ये घेतलं जाऊ लागलं. ही तर कुठे सुरुवात होती. अंदाज, बैजुबावरा, मुगलेआझम या त्यांच्या बड्या चित्रपटांबद्दल दुसऱ्या भागात बोलू या! (लेखक चित्रपट आणि संगीताचे अभ्यासक आहेत.)

# रुपेरी पडद्यावर अवतरणार मराठमोळा 'चायवाला'

बोलीभाषेत मात्र हि 'चाय' आहे हि चाय बनवणारा चायवाला सर्वांना रोज ताजेतवाने ठेवण्याचं काम करत असतो. हाच चायवाला आता रुपेरी पडद्यावर अवतरणार आहे. 'चायवाला' हा मराठी चित्रपट लवकरच सुरू होणार असल्याची घोषणा मोशन पोस्टर रिलीज करून करण्यात आली आहे. 'चायवाला'च्या रूपात एक विनोदी मराठी सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हॉट चॉकलेट प्रोडक्शनची प्रस्तुती असलेल्या या चित्रपटाचे सहनिर्मिते तानाजी वगरे आणि गोविंद वाघमारे आहेत. अजय-उद्धव या जोडगोळीकडे 'चायवाला'च्या दिग्दर्शनाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मेला है, कौन कहता चायवाला अकेला है' हे चित्रपटाच्या पोस्टरवरील वाक्य बरंच काही सांगणारं आहे. सोशल मीडियामुळे आज चायवाल्यांपासून वडापाववाल्यांपर्यंत सर्वजण प्रसिद्ध झाले आहेत. यात दिल्लीतील डॉली चायवाल्याची सोशल मीडियावर जबरदस्त चर्चा आहे. त्या पार्श्वभूमीवर 'चायवाला'तील नायक नेमका कसा असणार आहे, याबाबत उत्सुकता आहे. 'सम ड्रीम्स नेव्हर स्लीप' ही टॅगलाईनही खूप मार्मिक आहे. या चित्रपटाद्वारे प्रथमच एक अनाथ मुलगा आणि मुलगी रुपेरी पडद्यावर नायक-नायिकेच्या रूपात दिसणार आहेत. डोक्यावर पांढरी टोपी, बनियान आणि पाठीमागे चुलबुल पांडे स्टाईलमध्ये अडकवलेला गॉगल असा चायवालाचा पाठमोरा लूक पोस्टरमध्ये दिसत आहे. सूर्यवंशी, राजयोगिनी, पार्थ भालेराव, कमलेश सावंत आदी कलाकारांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाची पटकथा तसेच संवादलेखन विनय येरापले यांनी केलं आहे. लवकरच या चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात करण्यात येणार आहे. गीतकार विनय येरापले यांनी लिहिलेल्या गीतांना संगीतकार मिलिंद मोरे यांनी संगीत दिलं आहे. विजय पाटील रंगभूषा करणार असून, संतोष यादव कार्यकारी निर्माते आहेत.



# मतभेद सर्वत्र होतात, पण...

अभिनेत्री काजोल व अभिनेत्री राणी मुखर्जी या दोघीही बॉलीवूडमधील ९० च्या दशकातील सुप्रसिद्ध अभिनेत्री आहेत. अजुनही सिनेसृष्टीत सक्रिय असलेल्या या दोघीही एकमेकींच्या नातवाईक आहेत. काजोलचे वडील शोमू मुखर्जी आणि राणीचे वडील राम मुखर्जी हे सख्खे चुलत भाऊ होते. त्या नात्याने काजोल व राणी या चुलत बहिणी आहेत. दोघींचं जवळचं नातं असलं तरी त्यांचं एकमेकींशी फार सख्य नाही. राणीने काजोलबद्दल एका मुलाखतीत प्रतिक्रिया दिली आहे. एका मुलाखतीत राणीने काजोल व तिच्या नात्याबद्दल विधान केलं. ती म्हणाली, मला वाटतं की कुटुंब एक अशी गोष्ट आहे. जी तुमच्यासोबत कायम राहते. त्यामुळे जगाने तुमच्याकडे कुटुंबासारखं पाहणं गरजेचं असतं. मतभेद सर्वत्र होतात, पण मतभेदाचे कारणच नसेल तर मतभेद का व्हावेत? माझ्यात आणि काजोलमध्येही तेच झालं. जे झालं ते फक्त गैरसमज व एकमेकींशी नीट संवाद न साधल्याने झालं. राणीने काजोलशी असलेल्या मतभेदाबद्दल प्रतिक्रिया दिली आहे, त्यामुळे त्यांच्यातील दुरावा मिटल्याची चर्चा होत आहे. राणीच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास ती शेवटची 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' या चित्रपटात झळकली होती. सध्या ती तिच्या आगामी चित्रपटांच्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे. काजोलबद्दल बोलायचं झाल्यास ती 'लस्ट स्टोरीज २' या नेटफ्लिक्सवरील चित्रपटात दिसली होती. याशिवाय तिची द ट्रायल नावाची वेब सीरिज चांगलीच गाजली होती. या दोन्ही ओटीटीवरील कलाकृती होत्या.






# प्रिती झिंटाचे सिनेसृष्टीत दमदार कमबॅक

अभिनेत्री प्रिती झिंटा मोठ्या ब्रेकनंतर पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर काम करण्यास सज्ज झाली आहे. मागील काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या 'लाहोर १९४७' चित्रपटात प्रिती मुख्य भूमिकेत दिसणार आहे. नुकतेच या चित्रपटच्या शूटिंगला सुरुवात झाली आहे. यादरम्यानचे सेटवरील काही फोटो तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. काही वर्षांपूर्वी प्रिती लग्नानंतर अमेरिकेत शिफ्ट झाली होती.

गेल्या काही दिवसांपासून प्रिती मुंबईतच आहे. काही दिवसांपूर्वी प्रितीचे आयपीएल दरम्यानचे फोटो व्हायरल झाले होते. यानंतर आता ती 'लाहोर १९४७' मधून ती कमबॅक करत आहे. सिनेमाच्या शूटिंगला सुरुवात झाल्यानंतर प्रिती झिंटाने संतोषींबरोबरचा सेल्फीही पोस्ट केला. लाहोर १९४७ चं दिग्दर्शन राजकुमार संतोषी करणार आहेत. यात तिच्यासोबत अभिनेता सनी देओल झकळणार आहे. या सिनेमातून आमिर खान आणि सनी देओल पहिल्यांदाच एकत्र काम करत आहेत. आमिर या चित्रपटाच्या निर्मात्याचं काम करणार आहे. फिल्मचं शूट सध्या एका हवेलीत सुरू आहे. प्रितीला इतक्या वर्षांनी पडद्यावर पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. "Lahore १९४७' दरम्यान, ९० च्या दशकातील आघाडीची अभिनेत्री प्रिती झिंटाने १९९८ साली 'दिल से' सिनेमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. प्रिती झिंटाने २०१६ साली परदेशी बॉयफ्रेंड जीन गुडइनफसोबत लग्न केले. जीन तिच्यापेक्षा १० वर्षांनी लहान असून जीन गुडइनफ लॉस एंजेलिसमध्ये फायनान्स ॲनालिस्ट आहेत. २०२१ साली सरोगसीच्या माध्यमातून ती जुळ्या मुलांची आई झाली. यानंतर आता तिने पुन्हा एकदा सिनेसृष्टीत कमबॅक केले आहे.

# शाहरुख पुन्हा एकदा दिसणार 'डॉन'च्या भूमिकेत



बॉलीवूड बॉलिवूडचा बादशाह शाहरूख खानने २०२३ साली रुपेरी पडद्यावर कमबॅक केले आहे. गेल्या वर्षी त्याचे तीन चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले. या तिन्ही चित्रपटांनी बॉक्स ऑफिस दमदार कमाई केली होती. आता तो डॉनच्या अवतारात परतणार आहे. एकीकडे शाहरूख खानने डॉन फ्रंचाइजी सोडली आहे तर आता त्याला पुन्हा एकदा डॉन बनण्याची संधी मिळाली आहे. शाहरूख खान डॉन फ्रंचाइजीमधला तिसरा सीक्वलचा हिस्सा नाही. आता रणवीर सिंग डॉनची भूमिका साकारणार आहे. डॉनची फ्रंचाइजी सोडल्यानंतर आता शाहरूख खान त्याची लाडकी लेक सुहाना खानसोबत द किंगमध्ये दिसणार आहे. सुजॉय घोषच्या दिग्दर्शनाखाली बनलेल्या या चित्रपटात शाहरुख खान निगेटिव्ह भूमिकेत दिसणार आहे.

द किंग चित्रपटात शाहरूख खान केमिओ करणार असल्याचे बोलले जात होते. मात्र आता तो या चित्रपटात व्हिलनची भूमिका साकारणार असल्याचे बोलले जात आहे. द किंग हा सुहाना खानची मोठ्या स्क्रीनवरील पहिला चित्रपट असेल. यापूर्वी सुहानाचा द आर्चीज रिलीज झाला होता जो ओटीटी प्लॅटफॉर्म नेटफ्लिक्सवर प्रसारीत झाला होता. द किंग चित्रपटात गुरू आणि शिष्याची कथा रेखाटण्यात आली आहे. २०० कोटींच्या बजेटमध्ये बनत असलेल्या चित्रपटात ती ॲक्शन अवतारात दिसणार आहे. त्यासाठी कठोर परिश्रम घेत आहे. शाहरूख खान प्रेक्षकांसाठी चित्रपट बनवतो आहे आणि लोकांना त्याला ग्रे शेडमध्ये पाहायचे आहे. द किंगमध्ये तो सिद्धार्थ आनंद आणि सुजॉय घोषसोबत दिसणार आहेत. द किंगमधील शाहरुखच्या लूकबद्दल सांगायचे तर तो मोठे केस आणि थोडी दाढी अशा अंदाजात दिसणार आहे.

# ...म्हणून इलियाना चित्रपटांपासून दूर



अभिनेत्री इलियाना डिक्रूझ खूप दिवसानंतर पडद्यावर परतली आहे. या वर्षी मार्चमध्ये प्रदर्शित झालेल्या 'तेरा क्या होगा लवली' या चित्रपटाने तिने बॉलिवूडमधले पुनरागमन केले आहे. आता तिचा आणखी एक नवीन चित्रपट 'दो और दो प्यार' रिलीज झाला आहे. इलियानाने अलीकडेच चित्रपटातून ब्रेक घेतल्याची चर्चा आहे. इलियाना डिक्रूझने गरोदर असल्याने अभिनय सोडला होता. एका मुलाखतीत इलियानाने सांगितले की, तिने विचार करून हा निर्णय घेतला नव्हता. तिने सांगितले की, 'दो और दो प्यार' या चित्रपटाचे शूटिंग २०२१ साली झाले होते, पण तो आता प्रदर्शित झाला आहे. यावर ती म्हणाली की २०२० मध्ये कोरोना महामारीमुळे सर्व कामे ठप्प झाली होती. मोठ्या पडद्यापासून दूर राहून तिने ओटीटीवरही काम केले. २०२१ मध्ये ती 'द बिग बुल' चित्रपटात दिसली होती. तिने सांगितले की तिने २०२२ मध्ये एक वेब सीरिज शूट केली होती, पण प्रेग्नेंसीमुळे तिला ब्रेक घ्यावा लागला होता. इलियानाने सांगितले की, तिने गर्भवती होण्यापूर्वी कधीही ब्रेक घेण्याचा निर्णय घेतला नव्हता. आता तिच्या पुनरागमनानंतर प्रेक्षक तिच्या कामाचं कौतुक करत असल्यानं ती खूश आहे. इलियानाने सांगितले की, तिने 'दो और दो प्यार' चित्रपटात काम करण्यास होकार दिला कारण तिच्या पात्रासाठी फारशी फिट असण्याची मागणी नव्हती. या चित्रपटाची ऑफर मिळताच त्याने होकार दिला. इलियानाने चित्रपटाच्या दिग्दर्शकाशीही फिटनेसबाबत चर्चा केली. तिने दिग्दर्शकाला सांगितले होते की, सध्या ती पातळ नाही आणि चित्रपटात अशा मुलीची गरज असेल तर ती तशी करण्याच्या स्थितीत नाही. यावर दिग्दर्शक शिर्षा गुहा ठाकुरता यांनी तिला सांगितले की ती जशी आहे तशी सुंदर आहे.

# अंकिताने नाकारला होता भन्साळींचा मेगा चित्रपट



अभिनेत्री अंकिता लोखंडे यशाच्या शिखरावर आहेत. अशातच तिच्या एका वेब शोचीही घोषणा करण्यात आली आहे. अंकिता संदीप सिंगच्या वेब शोमध्ये दिसणार आहे. यामध्ये ती आम्रपालीची भूमिका साकारणार आहे. आता संदीप सिंगने खुलासा केला आहे की, अंकिताने 'गोलियों की रासलीला 'राम लीला'मधील दीपिका पदुकोणच्या भूमिकेसाठी ऑडिशन दिले होते. भन्साळी यांच्या 'गोलियों की रासलीलाराम लीला'मध्ये दीपिका पदुकोणने साकारलेल्या लीलाच्या भूमिकेसाठी अंकिताच्या ऑडिशनबद्दल चित्रपट निर्माते संदीप सिंग यांनी एक मनोरंजक किस्सा उघड केला. संदीपने रणवीर सिंगसोबत अंकिताच्या ऑडिशनच्या अनुभवाविषयी एक किस्सा शेअर केला आणि त्याने ऑडिशनच्या वेळी भन्साळी प्रॉडक्शनचे सीईओ म्हणून काम केल्याचे उघड केले. एका मुलाखतीत संदीप सिंह म्हणाले, असे नाही की ती रामलीलाचे ऑडिशन पास झाली नाही. तिने चांगले काम केले होते मात्र, भन्साळींना स्टार हवा होता. त्यावेळी चित्रपटाचे बजेट खूप जास्त होते. मला वाटते अंकिताने ऑडिशनमध्येच चांगली कामगिरी केली होती. ती म्हणाली, मी खूप भाग्यवान समजते की मी अशा चित्रपटांसाठी किमान ऑडिशन देऊ शकले. मला आशा आहे की, मी एक दिवस भन्साळींसोबत काम करेन. अभिनेत्रीने सांगितले की, भन्साळींनी तिला 'बाजीराव मस्तानी' करण्याची ऑफर दिली होती. अभिनेत्री म्हणाली, मला आठवतंय, संजय सरांनी मला फोन करून सांगितलं होतं, 'हा चित्रपट कर नाहीतर तुला पश्चाताप करावा लगले.